


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १२६९

REFBK-0008353
REFBK-0008353

# श्रीविठ्ठल-उपासना

१५५४

# श्रीविठ्ठल उपासना



श्रीविठ्ठलमहिमा, पांडुरंगस्तोत्र, भूपाळी, कांकडआरती, नमस्काराष्टक, स्तुति, अभंग, पदें, आरत्या, शेजारती, पंढरीचा वारकरी, पंढरपुरांतील प्रेक्षणीय स्थळें, ज्ञानोबांच्या पालखीचा सोहळा इत्यादि.

★

अनुक्रम १०३५५
विभाग
क्रमांक १२५५
वाचनालय

संपादक
लक्ष्मण गोपाळ परांजपे

★

८३५३
REFBK-0008353
REFBK-0008353

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य : ७ : चार आणे

# दोन शब्द

'श्रीविठ्ठल-उपासना' हें उपासनामार्गप्रदीपमालेचें सातवें पुष्प होय. यापूर्वीं श्रीदत्त, श्रीशिव, श्रीगणेश, श्रीराम, श्रीहनुमान व श्रीसाई या सहा उपास्यदेवतांचीं पुस्तकें निरनिराळीं संकलित करून त्या त्या उपासकांच्या हातीं आम्हीं दिलीं. तसेंच मालेचें हें सातवें पुष्प विठ्ठलभक्तांस नित्यपठणास उपयुक्त व्हावें या हेतूनें संग्रहित करण्याचा प्रयत्न केला आहे. भूपाळी, कांकड-आरती, नमस्काराष्टक, स्तुति, स्तोत्र इत्यादींचा या छोट्याशा पुस्तकांत समावेश केला असून, शिवाय विठ्ठलमहिमा, पंढरपुरांतील प्रेक्षणीय स्थळें व ज्ञानोबाच्या पालखीचा पंढरीला जावयाचा मार्गही दिला आहे. त्यामुळें सर्वच दृष्टींनीं भाविकांस हें पुस्तक उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

नमस्काराष्टक व श्रीविठ्ठलस्तुति हीं कवि मिलिंदमाधवकृत आहेत. त्यांनीं अल्पावधींत तीं आम्हांस रचून दिलीं त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

तसेंच हें पुस्तक संग्रहित करतांना अनेक पुस्तकांचा मीं आधार घेतला आहे. परंतु त्या सर्वांचा येथें नामोल्लेख न करतां मी त्यांचा सदैव ऋणी राहूं इच्छितों.

मुंबई,
११ जुलै, ५४

— संपादक

मुद्रक : गणेश सदाशिव बेंदूर : जय गुजरात प्रेस : गांवदेवी : मुंबई ७
प्रकाशक : लक्ष्मण गोपाळ परांजपे : ५५ । १४ मुगभाट : मुंबई ४

प्रथमावृत्ति : आषाढी एकादशी १८७६

# श्री विठ्ठल महिमा

मराठी ग्रंथ संग्रहालय
1343



**सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनीयां ॥ १ ॥**
**गळां तुळसीहार कांसे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥**
**मकर-कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजित ॥ ३ ॥**
**तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥**

हे विठ्ठला, संतांनीं व भक्तांनीं तुझा महिमा जागोजाग वर्णन केला आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, सांवता, जनाबाई इत्यादि संतांनीं तर आपल्या मधुर वाणीनें तुझें गुणगान अभंगा-अभंगांतून गाइलें आहे. या संतांनीं आजपर्यंत तुझ्या स्तुतिपर हजारों अभंग रचले! संतांचे हे अभंग महाराष्ट्रांतील घराघरांतून, देवमंदिरांतून व कपाटकुहरांतून अजूनही निनादत आहेत. तुझ्या ध्यानावर रचलेला श्रीतुकाराम-महाराजांचा वरील अभंग तर प्रत्येक भक्ताच्या मुखांत घोळत असतो. त्यामुळें तुझें हुबेहुब चित्र त्याच्या मनश्चक्षूसमोर येतें. पीतांबर परिधान केलेला, गळ्यांत तुळसीहार, कानांत मकराकृति कुंडलें, कंठीं कौस्तुभमणी व दोन्ही हात कटीवर ठेवून विटेवर उभें असलेलें तुझें सुंदर ध्यान अनन्य होय. लक्षावधि भक्तांच्या हृदयांत हें तुझें रूप कायमचें कोरलें गेलें आहे.

“ देवा, माउलीहून तूं मायाळू. चंद्राहून शीतळ. पाण्याहून पातळ. अमृत तूंच निर्माण केलेंस; पण त्याहून तूं गोडगोड आहेस. तुला कशाची उपमा देऊं? तुझ्यापुढें वाचाळपणा नको. तुला निवांत नमन करून चरणीं माथा ठेवावा हेंच बरें!”

"'**सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति**' ही एकच आस अंतरीं लागून राहिली आहे. तुझी मूर्ति सारखी डोळ्यांपुढें राहावी हीच माझी इच्छा! इतकेंच नव्हे, तर सर्व इंद्रियांनीं सुद्धां तुझेंच नामस्मरण करावें, कानांनीं तुझेंच गुणगान ऐकावें, मुखानें तुझेंच नांव घ्यावें, डोळ्यांनीं सदासर्वदा तुलाच पहात रहावें, व मनानें सुद्धां तुझ्याच पायीं रुंजी घालावी."

तुझ्या या रूपाचा व नामाचा ध्यास फक्त तुकोबारायांनाच लागला असें नाहीं, तर '**रूप पाहतां लोचनीं। सुख झालें वो साजणी**' म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजसुद्धां तुझ्या भजनीं लागले. ज्ञानोबारायांचा तर तूं 'बापरखुमादेवीवरू'! सांवता माळी तर '**कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी**' असें समजून जळींस्थळीं तुलाच पाहूं लागला. भोळी जनी तर 'ये ग ये ग विठाबाई' करून भीमा व चंद्रभागे-सह तुला आपल्या रंगणांत नाचावयास बोलावूं लागली. नामदेवाचें तर तुझ्याशिवाय पानही हालत नाहींसें झालें.

'**पाषाण करीं तरी पायरीच्या मिषें। तुझ्या द्वारीं वसें ऐसें करीं॥**' तुझ्या मंदिराच्या पायरीवर बसवण्याच्या निमित्तानें मला दगड कर—ही नामयाची इच्छा, तर 'माझ्या अस्थीसुद्धां जन्मजन्मांतरीं तुझ्याच चरणांशीं राहूं देत' ही चोखोबाची आर्त! याचप्रमाणें निळोबा, एकनाथ, गोरा कुंभार इत्यादि संतांची मन:स्थिति झाली. तुझ्या दर्शनासाठीं त्यांच्या हृदयांत एक प्रकारची ओढ लागून राहिली.

जसे तुझ्या भेटीसाठीं अनेक संत व भक्त वेडावून गेले, तसा तूंही त्यांच्यासाठीं कांहीं कमी वेडा झाला नाहींस! भक्तांचें कोडकौतुक तूंच पुरवलेंस. त्यांच्या इच्छेसाठीं नाहीं नाहीं तीं रूपडीं तूं घेतलींस. अहर्निश कष्ट सोसलेस, पण कधींही रागावला नाहींस. कबीराचे शेले विणतांना कधीं आळस केला नाहींस, किंवा जनीचें दळण-कांडण करतांना कधीं कंटाळा मानला नाहींस. तूं भक्तांसाठीं काय केलें नाहींस? सांवत्याचा

मळा तूंच शिंपलास, ज्ञानदेवाची भिंत ओढून गर्विष्ठ चांगदेवाला तूंच धडा शिकवलास, एकनाथाच्या घरीं पाणी भरलेंस, दामाजीसाठीं महाराचें रूप घेऊन बादशहाच्या दरबारांत मोहरांचे ढीग ओतलेस, एवढेंच नव्हे तर मीराबाईसाठीं आलेला विषाचा जहरी प्यालासुद्धां, हे विठ्ठला! तूंच प्राशन केलास.



**पुंडलिकाच्या भेटीसाठीं। पंढरीसी आला जगजेठी।**
**नासाग्रीं ठेवुनी दृष्टी। वाट पहासी भक्ताची॥**

पुंडलिकाच्या भेटीसाठीं तर तासन्‌तास तिष्ठत उभा राहिलास. आई-वडिलांची सेवा करीत असतां आपल्या भक्ताच्या तूं भेटीस गेलास. त्यानें एक वीट फेंकून तुझें स्वागत केलें. '**विटेवरी उभा व कटेवरी हात**' ठेवून तूं जो तेथें उभा राहिलास, तो अजूनही आम्हां जड-जीवांना दर्शन देण्यासाठीं चंद्रभागेच्या वाळवंटांत तसाच उभा आहेस. तरी हे विठ्ठला! भक्तांसाठीं धांवून येणारा व लक्ष-लक्ष अंत:करणें जिंकणारा असा जो तूं, त्या तुला माझा नमस्कार असो!

★

# श्रीपांडुरंगस्तोत्र

॥ श्रीगणेशाय नमः ॥ अथ पांडुरंगस्तोत्रप्रारंभः ॥ ॥ जय जय श्रीपंढरीनाथा ॥ भक्तवत्सला रुक्मिणीकांता ॥ तूंचि माझीं माता-पिता ॥ बंधु चुलता गणगोत ॥ १ ॥ इष्टमित्र सखा सज्जन ॥ तूंचि माझी संपत्ति धन ॥ रात्रंदिवस करितों स्मरण ॥ याविण साधन नेणेंचि ॥ २ ॥ ऐसें असतां कृपानिधी ॥ देहाभिमानाचिये संधी ॥ कामक्रोधाचिये बुद्धी ॥ मी त्रिशुद्धी सांपडलों ॥ ३ ॥ म्हणूनि इंद्रियें नाहींत स्वाधीन ॥ एकांतीं न घडे तुझें चिंतन ॥ आतां त्याचें निवारण ॥ कर्ता जगज्जीवन तूं एक ॥ ४ ॥ विश्वव्यापक तूं अनंता ॥ सर्वांठायीं तुझी सत्ता ॥ आतां निरसोन माझी चिंता ॥ निरवीं संतां निजकृपें ॥ ५ ॥ दीनदयाळा जगजेठी ॥ तूं पावलासी बहुतांच्या संकटीं ॥ अंबरीष बहुत होतां कष्टी ॥ उठाउठी धांविन्नलासी ॥ ६ ॥ दुर्वासें दिधला त्यासी शाप ॥ त्यामागें सुदर्शन लाविलें सकोप ॥ ऐसें निजभक्तांचें पडप ॥ तूं मायबाप पुरविता ॥ ७ ॥ अंबरीषाच्या कैवारें देवा ॥ दहा गर्भवास सोशिले तुवां ॥ नाना चरित्रें केशवा ॥ अवतारभावा दाखविसी ॥ ८ ॥ संकटीं पडतां प्रजापती ॥ तेव्हां मत्स्यअवतार धरिला प्रीतीं ॥ शंखासुर वधोनि सत्वरगती ॥ विधातया श्रुति दीधल्या ॥ ९ ॥ कमठरूप धरोनियां एकवेळ ॥ पृष्ठीवरी धरिला मंदराचळ ॥ चौदा रत्नें काढोनि तत्काळ ॥ वृंदारक सकळ तोषविले ॥ १० ॥ मोहिनीरूप धरूनि जाण ॥ देवांस करविलें अमृतपान ॥ ऐसे वर्णितां तुझे गुण ॥ आलासे शीण फणिवरा ॥ ११ ॥ हिरण्याक्ष दैत्य भारी ॥ तेणें पृथ्वी घेतली खांद्यावरी ॥ तेव्हां सूकर होऊनि श्रीहरी ॥ पावलासी लवलाहें ॥ १२ ॥ उर्वी धरोनि दाढेवरी ॥ असुर मारिला रणचत्वरीं ॥ ऐसी वर्णितां तुझी थोरी ॥ ब्रह्मकुमारी तल्लीन ॥ १३ ॥ हिरण्यकश्यपूनें प्रल्हाद गांजिला ॥ तो नानापरी रक्षिला ॥ अग्नींत टाकिती तयाला ॥ दाह आंगा न लागेचि ॥ १४ ॥ समुद्रीं टाकिती क्रोधेंकरून ॥ परी त्यासी बुडवूं न शके जीवन ॥ मुखें करितां तुझें स्मरण ॥ सर्प दारुण न डंखिती ॥ १५ ॥ पर्वताहूनि लोटितां सत्वर ॥ परी सर्वथा न होय

चूर ॥ विष पाजितां अति दुर्धर ॥ परी न जाय साचार प्राण त्याचा ॥ १६ ॥ हिरण्यकश्यपु पुत्रालागुन ॥ म्हणे तुझ्या नरहरीचें स्थळ कोण ॥ येरू देतसे प्रतिवचन ॥ विश्व भरूनि उरलासे ॥ १७ ॥ स्तंभांत आहे म्हणे असुर ॥ म्हणोनि मारिला लत्ताप्रहार ॥ तेथें प्रगटलासि तूं शारंगधर ॥ दैत्य थोर विदारिला ॥ १८ ॥ ऐशापरी प्रल्हादभक्ता ॥ तुवां रक्षिलें अच्युता ॥ नरहरी अवतार पंढरीनाथा ॥ घेतला होता त्यासाठीं ॥ १९ ॥ विनंति करितां आखंडल ॥ वामन झालासी दीनदयाळ ॥ बळीसी छळूनि तत्काळ ॥ त्याचा द्वारपाळ झालासी ॥ २० ॥ रेणुकेच्या कैवारें जाण ॥ क्रोधें वधिला सहस्रार्जुन ॥ त्रिःसप्तकें परशुरामें जाण ॥ क्षत्रिय पृथ्वीचे मारिले ॥ २१ ॥ राज्यीं स्थापिले धरामर ॥ स्वजातीचा अभिमान थोर ॥ ऐसा तूं रुक्मिणीवर ॥ अति उदार सर्वस्वें ॥ २२ ॥ बंदीं पडले सकळ सुरवर ॥ मग घेतला श्रीरामावतार ॥ निजांगें वधोनि दशकंधर ॥ देव सत्वर सोडविले ॥ २३ ॥ सांडूनि जातिकुलाभिमान ॥ तनमनधनेंसीं आला शरण ॥ तो चिरंजीव करोनि बिभीषण ॥ लंका दान दीधली ॥ २४ ॥ वसुदेवदेवकीच्या उदरीं ॥ अवतार घेतला श्रीहरी ॥ नंदयशोदेच्या मंदिरीं ॥ नानापरी क्रीडलासी ॥ २५ ॥ माती खातां एके दिनीं ॥ यशोदा पाहे क्रोधेंकरूनी ॥ मग अनंत ब्रह्मांडें तिजलागुनी ॥ दाविलीं वदनीं निजलीला ॥ २६ ॥ कंसचाणूर मर्दून ॥ राज्यीं स्थापिला उग्रसेन ॥ मग समुद्रांत द्वारका निर्मून ॥ वस्तीस्थान पैं केलें ॥ २७ ॥ पांडवांसी होतां नाना आपदा ॥ त्यांसी संकटीं रक्षिलें गोविंदा ॥ भीमासी होतां विषबाधा ॥ त्यासी मुकुंदा रक्षिलें ॥ २८ ॥ लाक्षागृहीं पंडुसुत ॥ जळतां पळविले विवरांत ॥ ऐसा कृपाळु तूं लक्ष्मीकांत ॥ पवाडे गर्जत पुराणीं ॥ २९ ॥ धर्माघरीं तुवां श्रीरंगें ॥ उच्छिष्टें काढिलीं निजांगें ॥ देखोनि अर्जुनाच्या प्रेमरंगें ॥ घोडीं निजांगें धूतलीं ॥ ३० ॥ वाढितां दुर्जनांच्या पंक्तिपटीं ॥ तों कंचुकीची सुटली गांठी ॥ द्रौपदी पडली संकटीं ॥ तेव्हां जगजेठी स्तविलें तुज ॥ ३१ ॥ ते समयीं तूं दीनदयाळा ॥ चतुर्भुज केली द्रुपदबाळा ॥ ऐसा तूं घनसांवळा ॥ भक्तप्रेमळा सुखाब्धी ॥ ३२ ॥

एकदांचि कौरव अन्न मागती ॥ तैं प्रतिपात्रीं निर्मिली द्रौपदीसती ॥ गांधार लज्जित होऊनि चित्तीं ॥ मग पहाती अधोमुखें ॥ ३३ ॥ धर्मराजें पण हरविला ॥ तेव्हां दुर्योधन संतोषला ॥ सभेसि आणिली द्रुपदबाळा ॥ काय बोलिला दुर्योधन ॥ ३४ ॥ वस्त्र हिरोनि याज्ञसेनी ॥ आतांच नग्न दाखवा जनीं ॥ संकट जाणूनि चक्रपाणी ॥ तुझी विनवणी करीतसे ॥ ३५ ॥ ऐकूनि द्रौपदीचें करुणवचन ॥ द्वारकेहून केलें धांवणें ॥ गरुड, पवन आणि मन ॥ वेग त्याहूनि विशेष ॥ ३६ ॥ दुःशासनें फेडितां अंबर ॥ वस्त्रें नेसविलीं अपार ॥ ऐसें कौतुक शारंगधर ॥ दाविसी थोर निजभक्तां ॥ ३७ ॥ वनवास कंठितां पांडवांसी ॥ तों छळणे पातला दुर्वासऋषी ॥ सत्वर भोजन मागतां निशीं ॥ संकट धर्मासी पडियेलें ॥ ३८ ॥ त्या संकटीं देवाधिदेवा ॥ द्रौपदीनें केला तुझा धांवा ॥ मग लवलाहें केशवा ॥ रचिली माव अघटित ॥ ३९ ॥ गंगातीरीं द्रौपदीसहित ॥ निर्माण केले पंडुसुत ॥ अन्नें वाढोनियां तृप्त ॥ ऋषि समस्त जेवविले ॥ ४० ॥ ऐशी अद्भुत तुझी कीर्ति ॥ व्यासें वर्णिली भारतीं ॥ तैशापरी रुक्मिणीपती ॥ पाव मजप्रती ये वेळीं ॥ ४१ ॥ नक्रें धरिलें गजेंद्रासी ॥ तैं तुज स्मरला हृषीकेशी ॥ मग सत्वर पावोनि तयासी ॥ सोडविलें निजकृपें ॥ ४२ ॥ जळ प्यावया काननीं ॥ तों पारधियानें कोंडिली हरणी ॥ एके दिशे वणवा लावोनी ॥ बाण गुणीं लाविला ॥ ४३ ॥ एके दिशे उभें केलें श्वान ॥ एकीकडे पाश घालोन ॥ हें देखोनियां हरिण ॥ तुझें चिंतन करीतसे ॥ ४४ ॥ तीस पावलासी तूं वैकुंठनाथ ॥ ससा प्रगटला अकस्मात ॥ तयामागें श्वान त्वरित ॥ पळोनि गेलें तेधवां ॥ ४५ ॥ पारधी सीत वोढितां गुणीं ॥ तंव तें मोडलें तत्क्षणीं ॥ पाशावरी आला अग्नी ॥ तेणें जाळूनि टाकिलें ॥ ४६ ॥ गगनीं बोळला मेघराज ॥ तेणें वणवा विझविला सहज ॥ यापरी निजभक्तांचें चोज ॥ तूं अधोक्षज पुरविता ॥ ४७ ॥ कपोता कपोती वृक्षावरी ॥ असतां व्याध पातला सत्वरीं ॥ ससाणा सोडिला तयांवरी ॥ धनुष्य निजकरीं ओढिलें ॥ ४८ ॥ तया संकटीं देवाधिदेवा ॥ पक्षी करिती तुझा धांवा ॥ मग सर्परूप धरूनि तेव्हां ॥ पारधियासी डंखिलें ॥ ४९ ॥ चांचरी गेला हातींचा बाण ॥ तेणें ससाणा

पावला मरण ॥ तरुवरी पक्षी दोघेजण ॥ निजकृपेनें रक्षिले ॥५०॥ तापसिया पारधी बोले पण ॥ चतुर्भुज सावज आणितों धरून ॥ देखोनि तयाचें निर्वाण ॥ दीधलें दर्शन व्याधासी ॥५१॥ कलियुगीं बौद्धअवतार सहज ॥ परी निजभक्तार्शी बोलसी गुज ॥ ऐसे ते संतमहाराज ॥ अभंगीं पैज बोलती ॥५२॥ पुंडलिकाच्या भेटीसाठीं ॥ पंढरीसी आला जगजेठी ॥ नासाग्रीं ठेवूनि दृष्टी ॥ वाट पहासी भक्तांची ॥५३॥ नामयाची देखोनि भक्ती ॥ त्यासंगें जेविलासी श्रीपती ॥ ज्ञानदेवाची ओढोनि भिंती ॥ दाविली ख्याती चांगदेवा ॥५४॥ कबीराचे मागीं विणिले शेले ॥ जनीचें दळणकांडण केलें ॥ रोहिदासाच्या उदरीं दाविलें ॥ यज्ञोपवीत विप्रांसी ॥५५॥ सांवत्याचा भक्तवत्सला ॥ तुवां खुरपिला स्वहस्तें मळा ॥ चोख्यामेळ्यासीं दीनदयाळा ॥ ढोरें ओढूं लागलासी ॥५६॥ गोरा कुंभार निजभक्त पुरा ॥ त्याचीं मडकीं घडिसी शारंगधरा ॥ दामाजीपंतासी रुक्मिणीवरा ॥ जाऊनि बेदरा रक्षिलें ॥५७॥ कूर्मदास चरणविरहित ॥ त्यानें धरिली भेटीची आर्त ॥ त्यासाठीं पायीं चालत ॥ लहुळासी त्वरित गेलासी ॥५८॥ सेनाभक्त बैसला पूजेसी ॥ म्हणोनि नृपवर कोपला त्यासी ॥ निजांगें नापिक हृषीकेशी ॥ होऊनि रायासी तोषविलें ॥५९॥ मिराबाईसाठीं विठ्ठला ॥ पित्यानें पाठविला विष-प्याला ॥ तो तुवां अमृतासमान केला ॥ तूं झालासी अधिकारी ॥६०॥ रामदासाची भक्ती देखोनी ॥ डाकुरा आलासी द्वारकेहुनी ॥ वालभर सुवर्ण घालितां त्यांनीं ॥ पारडें उचलोनि वर गेलें ॥६१॥ आशीर्वाद देतां तुलसीदास ॥ उठविलें सतीच्या भ्रतारास ॥ धनाजाटाच्या शेतास ॥ पेरिलें सायासें गोविंदा ॥६२॥ नरसीमेहत्याची भक्ति चोखडी ॥ त्याची द्वारकेसी भरसी हुंडी ॥ पुत्राच्या लग्ना लवडसवडी ॥ आलासी तांतडी धांवोनियां ॥६३॥ नामदेवाचे कीर्तनीं निर्मळ ॥ आवंढ्यानागनाथीं फिरविलें देऊळ ॥ कर्माबाईसी तूं घननीळ ॥ खिचडी मागसी निजमुखें ॥६४॥ हरिशंकररूप दाउनी ॥ नरहरी सोनार लाविला भजनीं ॥ तुझे पवाडे शारंगपाणी ॥ वर्णितां वाणी कुंठित ॥६५॥ मांजरीचीं

पिलीं मडक्यांत होतीं ॥ आव्यांत घालितां सत्वरगती ॥ बाळें आकांत करिती ॥ तों मांजर भोंवतीं फिरतसे ॥ ६६ ॥ कृशान पेटला बहुत जेव्हां ॥ कुलाल चित्तीं समजला तेव्हां ॥ म्हणे पंढरीनाथा देवाधिदेवा ॥ अघटित माव रचीं आतां ॥ ६७ ॥ अग्नींत पिलीं न वांचलीं जर ॥ मी सर्वथा न करीं संसार ॥ तेथें पावलासी शारंगधर ॥ भक्तनिर्धार देखोनी ॥ ६८ ॥ खोवोनि पीतांबराचे सोगे ॥ कौस्तुभमाळा टाकिल्या मागें ॥ धांवूनि आलासी लगबगें ॥ तूं निजांगें दीनदयाळा ॥ ६९ ॥ पिलीं होतीं ज्या भाजनांत ॥ तें कच्चें राहिलें आव्यांत ॥ कुंभार उचलून जों पाहत ॥ तों पिलीं जिवंत देखिलीं ॥ ७० ॥ ऐसें अघटित रुक्मिणीपती ॥ तुझें चरित्र वर्णिलें संतीं ॥ माझी तों मंदमती ॥ जाणसी चित्तीं दयाळा ॥ ७१ ॥ भानुदासासी छळितां रामराव ॥ शूळासी फुटले पल्लव ॥ ऐसी अघटित तुझी माव ॥ विरंचीसी ठाव कळेना ॥ ७२ ॥ एकनाथाची भक्ति देखोनी ॥ द्वादशवर्षें वाहिलें पाणी ॥ देवपूजेसी गंध उगाळुनी ॥ देसी चक्रपाणी लवलाहें ॥ ७३ ॥ तेरा दिवस उदकांत ॥ तुवां उभें राहोनि जळांत ॥ तुकोबाचे अभंग बुडविले होते ॥ कोरडे ग्रंथ रक्षिले ॥ ७४ ॥ बोधलाभक्त प्रेमळ दास ॥ त्याचे थोटे ताटास आणिले कणस ॥ रितें पेंव भरोनि सायास ॥ कौतुक जनांस दाखविलें ॥ ७५ ॥ संतोबा पवाराच्या वचनीं ॥ कांसव झालासी चक्रपाणी ॥ भिंवरेमाजीं पृष्ठी देऊनी ॥ यात्रा उतरोनि पार केली ॥ ७६ ॥ निंबराजाच्या खांद्यावरी ॥ मयूरकुंच ढाळिसी श्रीहरी ॥ दृष्टीं देखोनि ते अवसरीं ॥ नरनारी तटस्थ ॥ ७७ ॥ कांसेगांवचा पठाण ॥ विसोबा सराफ अडविला त्यानें ॥ संकट जाणोनि जगज्जीवन ॥ वारिलें ऋण तयाचें ॥ ७८ ॥ ऐसे तुझे भक्त अपार ॥ गणितां बुद्धीस न कळे पार ॥ सागराचे कल्लोळ कोठवर ॥ मोजील नर विवेकी ॥ ७९ ॥ पृथ्वीवरील तरुवर निश्चिती ॥ त्यांची कोठवर ध्यावी गणती ॥ तैशाच तुझ्या असंख्यात विभूती ॥ वर्णितां श्रुति कुंठित ॥ ८० ॥ हें संतांच्या मुखेंकरूनी ॥ कीर्तनीं ऐकिलें चक्रपाणी ॥ त्याचा विश्वास धरूनि मनीं ॥ तुझे भजनीं लागलों ॥ ८१ ॥ आतां समर्थासी उचित ॥ ऐसें करावें माझें हित ॥ उपेक्षा करिसील निश्चित ॥

अनुक्रम ... विभाग ... ११

तरी हांसतील संत तुजलागीं ॥ ८२ ॥ देवा तू ब्रह्मांडनायक ॥ तुझे रोमरंध्रीं सकळ लोक ॥ तो तूं पुंडलिकास देऊनि भावें ॥ उभा सन्मुख तिष्ठसी ॥ ८३ ॥ तें रूप धरोनियां चित्तीं ॥ तुज आठवितों रुक्मिणीपती ॥ ऐसी ऐकूनियां विनंती ॥ करुणा चित्तीं कां न ये ॥ ८४ ॥ मज वाटतें रूप सगुण ॥ टाकोनि आतां जाहालासी निर्गुण ॥ म्हणोनि ब्रीदाचा अभिमान ॥ सोडिला संपूर्ण ये काळीं ॥ ८५ ॥ कां माझे दोष दारुण ॥ भस्म न होती तुझिया स्मरणें ॥ म्हणोनि निष्ठुर करोनि मन ॥ दिधलें टाकून मजलागीं ॥ ८६ ॥ कां निजभक्तीं लाविली प्रीती ॥ ध्यानांत गोंविलें श्रीपती ॥ म्हणोनि न ऐकिसी माझी विनंती ॥ ऐसें चित्तीं वाटतसे ॥ ८७ ॥ कीं ऐसें वाटतें माझ्या मनांत ॥ तुज लेंकरें जाहलीं बहुत ॥ म्हणोनि निष्ठुर करोनि चित्त ॥ मज निश्चित उपेक्षिलें ॥ ८८ ॥ यात्रा मिळाली अधोक्षजा ॥ कीं राउळीं मांडिली महापूजा ॥ तेथेंचि प्रेमा लागला तुझा ॥ विसर माझा पडला कीं ॥ ८९ ॥ कीं संचित माझें वोखटें ॥ जाणोनि तुजला भय वाटे ॥ मग निष्ठुर करोनि मन मोठें ॥ येतां वाटे परतलासी ॥ ९० ॥ कीं डोळे झांकून कठिणपण ॥ सोडोन देवपणाचा अभिमान ॥ म्हणोनि विनंति न ऐकोन ॥ दिधलें टाकून मजलागीं ॥ ९१ ॥ कीं कलीचें बळ दुर्धर जाण ॥ म्हणोनि न करिसी माझें धांवणें ॥ कीं प्रेमळ भक्तांचें ऐकोन कीर्तन ॥ तेथें बैसोन श्रवण करिसी ॥ ९२ ॥ तुझी कीर्ति अद्भुत झाली देवा ॥ म्हणोनि न ऐकसी माझा धांवा ॥ कीं घडोन नाहीं आली सेवा ॥ म्हणोनि देवा मोकलिलें ॥ ९३ ॥ कीं हा समय अमंगळ जाण ॥ म्हणोनि न करिसी माझें धांवणें ॥ कीं आडवी येऊनि माता रुक्मिण ॥ तूतें धरून बैसविलें ॥ ९४ ॥ कीं मी पतित साचार ॥ घडला सकळ दुराचार ॥ सांगतां अपराधांचे विस्तार ॥ शिणेल फणिवर व्यर्थचि ॥ ९५ ॥ अंतरसाक्षी तूं चैतन्यघन ॥ माझ्या कर्मांचीं जाणसी खूण ॥ आतांचि गुणदोष वारून ॥ भवबंधन निरसावें ॥ ९६ ॥ तुझिया नामावांचून जर ॥ अन्य उपाय केले फार ॥ तरी हांसती सकळ वैष्णववीर ॥ म्हणती निर्धार यासी नाहीं ॥ ९७ ॥ कल्पतरूखालीं बैसलों जाण ॥ तेथें क्षुधित अन्नाविण ॥ तरी हा शब्द सुरतरूकारण ॥ जाण संपूर्ण लाविती ॥ ९८ ॥ कीं

धेनूचें पाडस पय ॥ अजेच्या सडाशीं चोखूं जाय ॥ तरी ती म्हणती बुरट गाय ॥ पंढरीराय जाणसी तूं ॥ ९९ ॥ तृषा लागतां चातकास ॥ त्यानें मेघाची करावी आस ॥ तेवीं संकट पडतां आम्हांस ॥ तुज सायासें आळवावें ॥ १०० ॥ बाळकासी क्षुधा लागतां नेटें ॥ तेणें मातेचे स्तनीं घ्यावे झटे ॥ तेवीं आम्हांस पडतां संकटें ॥ तेव्हां तुझी वाट पहावी ॥ १ ॥ नातरी पाडस क्षुधित झालें वनीं ॥ तेणें सायासें धुंडावी हरिणी ॥ तैसें संकटीं चक्रपाणी ॥ तुजलागोनी आळवावें ॥ २॥ कीं पतिव्रता इच्छी परमार्थ ॥ तरी आपुले पतीचें घ्यावें तीर्थ ॥ तेवीं कामक्रोधादिकीं पीडितां बहुत ॥ भजन निश्चित करावें ॥ ३ ॥ गगनीं नक्षत्रें आहेत बहुत ॥ परी चकोरासी तोषवी रोहिणीकांत ॥ तेवीं आम्हां पतितांचें हित ॥ तुजवीण निश्चित कोण करी ॥ ४ ॥ बाळकासी क्षुधा लागतां मोठी ॥ तेव्हां कांसव पाहे कृपादृष्टीं ॥ तैशापरी जगजेठी ॥ मज हे संकटीं रक्षावें ॥ ५ ॥ जरी मी वायां गेलों येथ ॥ तरी हांसें होईल पिशुनांत ॥ आतां आपणांस होईल उचित ॥ तैसेंचि निश्चित करावें ॥ ६ ॥ ब्रीदासी बोल लागेल तत्त्वतां ॥ तैसें न करीं पंढरीनाथा ॥ महिपती चरणीं ठेवूनि माथा ॥ विनंति अनंता करीतसे ॥ ७ ॥ स्वस्ति श्रीपांडुरंगस्तोत्र ॥ नित्य पठती भाविक नर ॥ निश्चय देखोनि रुक्मिणीवर ॥ पुरवी मनोरथ तयांचे ॥ १०८ ॥ इति श्रीपांडुरंगस्तोत्रं संपूर्णम् ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

★

## भूपाळी पंढरीची

उठा उठा हो वेगेंसीं । चला जाऊं पंढरीसी ।
भेटों विठ्ठल-रखुमाईसी । त्रिविधताप हरतील ॥ ध्रु० ॥
चंद्रभागे करूं स्नान । घेऊं पुंडलिकाचें दर्शन ।
तेथें भेटती संतजन । तेणें मन निवेल ॥ १ ॥
गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागीरथी ।
तुंगभद्रा भोगावती । येती श्रीपतिदर्शना ॥ २ ॥

तापी नर्मदा कावेरी । पंचगंगा गोदावरी ।
स्नानें केलिया बोहरी । महादोष हरतील ॥ ३ ॥
रामानंदाचें माहेर । क्षेत्र नाम पंढरपुर ।
माता पिता विश्वंभर । पैलपार तरतील ॥ ४ ॥

★

# कांकडआरत्या

१

उठा उठा हो साधक, साधा आपुलालें हित ।
गेला गेला हा नरदेह, मग कैंचा भगवंत ॥ १ ॥
उठा उठा हो वेगेंसीं, चला जाऊं राउळासी ।
झडतिल पातकांच्या राशी, कांकडआरती पाहोनी ॥ ध्रु० ॥
जागें करा रुक्मिणीवरा, देव आहे निजसुरा ।
वेगें निंबलोण करा, दृष्ट होइल म्हणउनियां ॥ २ ॥
उठोनियां हो पाहांटे, पाहा विठ्ठल उभा विटे ।
चरण तयाचे गोमटे, अमृतदृष्टीं अवलोका ॥ ३ ॥
पुढें वाजंत्रीं वाजती, ढोल दमामे गर्जती ।
होत कांकडआरती, माझ्या पंढरीरायाची ॥ ४ ॥
सिंहनाद शंख-भेरी, गजर होतो महाद्वारीं ।
केशवराज विटेवरी, नामा चरण वंदितो ॥ ५ ॥

२

भक्तीचिये पोटीं बोध-कांकडा ज्योती ।
पंचप्राण जीवेंभावें ओंवाळूं आरती ॥ १ ॥
ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा ।
दोन्ही कर जोडूनि चरणीं ठेविला माथा ॥ ध्रु० ॥

काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती ।
कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ॥ २ ॥
राई रखुमाबाई उभ्या दोन्ही दों बाहीं ।
मयूरपिच्छचामरें ढाळिती ठायींच्या ठायीं ॥ ३ ॥
विटेसहित पाय म्हणुनी भावें ओंवाळूं ।
कोटी रवि-शशी दिव्य उगवले हेळूं ॥ ४ ॥
तुका म्हणे दीप घेउनी उन्मनींत शोभा ।
विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥ ५ ॥

★

## नमस्काराष्टक

मना विठ्ठलाचे पदीं लीन व्हावें ।
सदासर्वदा नाम तें तूं वदावें ।
असे एकला तोचि आधार आतां ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ १ ॥

जगीं धन्य तो नाम घेई हरीचें ।
जयाच्या कृपें बंध जाती भवाचे ।
असे वंद्य जो सर्वही साधुसंतां ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ २ ॥

जिथें चंद्रभागा नदी नित्य वाहे ।
विठाईसखी माउली तेथ राहे ।
भुले भक्तिभावा भली मायमाता ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ ३ ॥

भवाच्या भयें त्रासलों रे दयाळा ।
विनंती किती मी करूं हे कृपाळा ।
क्षणीं धांव घालीं नको वेळ आतां ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ ४ ॥

तुझ्या दर्शनाची मना ओढ लागे ।
कृपेची तुझ्या भीक मी फक्त मागें ।
जगन्नायका तूं जगाचा नियंता ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ ५ ॥
नको अंत पाहूं नको दूर राहूं ।
जगीं दुःखराशी करा काय साहूं ।
तुझी थोर लीला तुझी थोर सत्ता ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ ६ ॥
मना हौस मोठी तुला शुद्ध भावें ।
स्मरावें, भजावें, पदीं लीन व्हावें ।
घडो नित्य सेवा तुझी दीननाथा ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ ७ ॥
अगा रुक्मिणीच्या वरा देवराया ।
करावी दुरी सर्व ही मोहमाया ।
असावी कृपा सर्वदा भाग्यवंता ।
नमो विठ्ठला पांडुरंगा अनंता ॥ ८ ॥

★

## श्रीविठ्ठलस्तुति

ॐ नमो श्रीविठ्ठला । विष्णुमूर्ति जगत्पाळा ।
भक्तप्रिया कृपाळा । तव स्तुति गातसें ॥ १ ॥
निवृत्ति आणि ज्ञानदेव । मुक्ताई, सोपानदेव ।
एकनाथ, नामदेव । विठ्ठलनामीं रंगले ॥ २ ॥
संतश्रेष्ठ तुकाराम । म्हणे घ्यावें विठ्ठलनाम ।
विठ्ठल तारक विश्राम । मुक्त करी संसारीं ॥ ३ ॥
जयानें ओळखिला हरी । धन्य धन्य तो संसारीं ।
मोक्ष येतो तयाचे घरीं । अष्टसिद्धि घेऊनी ॥ ४ ॥
विठ्ठल मुखीं गातां । हरेल अवघी चिंता ।
घ्यावा न लागे मागुता । जन्म जगीं एकही ॥ ५ ॥

विठ्ठलाचिया दासा । विठ्ठलचि दाही दिशा ।
जैसा भाव पावे तैसा । भक्तालागीं भगवंत ॥ ६ ॥
भक्तिभावाचिया बळें । मोक्षाचा मार्ग मिळे ।
विठ्ठलनाम आगळें । गावें सदासर्वदा ॥ ७ ॥
धन्य धन्य ती पंढरी । पुण्यराशी पवित्र नगरी ।
वैकुंठवासी श्रीहरी । जेथें वास करीतसे ॥ ८ ॥
सुकुमार सुंदर सांवळा । गळां तुळशीच्या माळा ।
भालीं चंदनाचा टिळा । ध्यान गोड गोजिरें ॥ ९ ॥
अति कोमल चारी हस्त । शंखचक्रगदामंडित ।
मुगुट तेजाळ विराजत । कोटिसूर्यप्रभेपरी ॥ १० ॥
पुंडलिकें फेंकिली वीट । देव राहिला उभा निमुट ।
कटेवरी कर नीट । दिव्य शोभा विराजे ॥ ११ ॥
ऐसा वैकुंठींचा राणा । भीमातीरीं आहे जाणा ।
आत्मस्वरूपाची खुणा । पटली संतसज्जनां ॥ १२ ॥
विठ्ठल बोलावा देतां । विठ्ठल बोलावा घेतां ।
हांसतां, खेळतां, चालतां । विठ्ठल बोलावा ॥ १३ ॥
विठ्ठल बोलावा गातां । विठ्ठल बोलावा खातां ।
सानथोर कार्य करितां । विठ्ठल बोलावा ॥ १४ ॥
विठ्ठल बोलावा जनीं । विठ्ठल बोलावा विजनीं ।
भजनीं आणि कीर्तनीं । विठ्ठल बोलावा ॥ १५ ॥
नमो विठ्ठला तारका । ब्रह्मनामा विशेखा ।
तूंच खरा माझा सखा । मायामोहजालीं ह्या ॥ १६ ॥
निर्गुणा, सगुणस्वरूपा । देवाधिदेवा मायबापा ।
तुझी झालिया कृपा । दुजें कांहीं नलगे मज ॥ १७ ॥
नमो नमो एकतत्त्वा । आदिब्रह्म शुद्धसत्त्वा ।
जगज्जीवना परतत्त्वा । शरण तुला विठ्ठला ॥ १८ ॥
तूंचि निर्धार नियंता । चैतन्यशक्ति पदार्थां ।
तूंचि चित्तशांतिदाता । भाग्यदाता भगवंता ॥ १९ ॥
तव गुणीं चित्त रमो । सर्वदा तव रूप गमो ।
तव चरणीं मस्तक नमो । पांडुरंगा विठ्ठला ॥ २० ॥

★

# गोड अभंग

(१)

रूप पाहतां लोचनीं । सुख झालें वो साजणीं ॥ १ ॥
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ ध्रु० ॥
बहुता सुकृतांची जोडी । म्हणुनि विठ्ठलीं आवडी ॥ २ ॥
सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर ॥ ३ ॥

(२)

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥१॥
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा जीवींचिया ॥ ध्रु० ॥
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥२॥
बापरखुमादेवीवरु विठ्ठलेंसीं भेटी । आपुले संवसाटी करुनि ठेला ॥३॥

(३)

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनीयां ॥ १ ॥
गळां तुळसीहार कांसे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ ध्रु० ॥
मकर-कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजित ॥ २ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ३ ॥

(४)

सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति । रखुमाईच्या पती सोयरिया ॥ १ ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ ध्रु० ॥
विठो माउलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥ २ ॥
तुका म्हणे कांहीं न मागों आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ३ ॥

(५)

देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ॥ १ ॥
तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावे ॥ ध्रु० ॥
मुखें गातों गीत वाजवितों टाळी । नाचतों राऊळीं प्रेमसुखें ॥ २ ॥
तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळही ॥ ३ ॥

(६)

घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥
डोळे तुम्ही घ्या रे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥ ध्रु० ॥
तुम्ही आईका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ २ ॥
मना तेथें धांव घेईं । राहीं विठोबाचे पायीं ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ४ ॥

(७)

विठ्ठल आमुचें जीवन । आगम-निगमांचें स्थान ।
विठ्ठल सिद्धींचें साधन । विठ्ठल ध्यान विसांवा ॥ १ ॥
विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तहि पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥ ३ ॥
विठ्ठल जिवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियेला चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ५

(८)

तूं माउलीहूनि मवाळ । चंद्राहूनि शीतळ ।
पाणियाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥
देऊं कशाची ऊपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा ।
ओंवाळूनि नामा । तुझ्यावरूनि टाकिलों ॥ ध्रु० ॥
तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परता ।
पांचां तत्त्वांचा जनिता । सकळ सत्तानायक ॥ २ ॥
कां न बोलोनि आतां । उगाच चरणीं ठेवितों माथा ।
तुका म्हणे पंढरीनाथा । क्षमा करीं अपराध ॥ ३ ॥

( ९ )

आणिक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्तापासूनियां ॥ १ ॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ ध्रु० ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ २ ॥
तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ तें ध्यान विटेवरी ॥ ३ ॥

( १० )

बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले ॥ १ ॥
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल-रखुमाई ॥ २ ॥
नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥ ३ ॥
परेहूनि परतें घर । तेथें राहूं निरंतर ॥ ४ ॥
सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ॥ ५ ॥

( ११ )

तुझिये सत्तेनें वेदासी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥ १ ॥
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणुनी शरण आलों ॥ २ ॥
मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें । वायूनें विचरावें सत्ते तुझे ॥ ३ ॥
नामा म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभु तूं निर्धार पांडुरंगा ॥ ४ ॥

( १२ )

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥
चरण मी न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगळ नाम । हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥
नामा म्हणे केशवराजा । केला पण चालवीं माझा ॥ ४ ॥

( १३ )

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणीक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥
हेंचि मज घडो जन्म-जन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥ २ ॥
मुखीं सदा नाम संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥ ३ ॥
नामा म्हणे नित्य तुझे महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥ ४ ॥

( १४ )

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे ॥१॥
तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥२॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भवपाश पांडुरंगे ॥३॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घालीं मज पांडुरंगे ॥४॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वालभा । मागें पुढें उभा सांभाळिशी ॥५॥

( १५ )

अणु-रेणूपासुनी ब्रह्मांडीं भरला । तो म्यां देखिला विटेवरी ॥ १ ॥
स्थावर जंगम भरूनी उरला । तो म्यां देखिला पंढरीये ॥ २ ॥
वेद-शास्त्र-पुराणें गाती जयासाठीं । तो पुंडलिकापाठीं उभा दिसे ॥ ३ ॥
वेडावल्या श्रुती न कळे म्हणती । तो उभा श्रीपती वाळुवंटीं ॥ ४ ॥
संतांचा समागम गाती आनंदानें । तो हरिकीर्तनीं नाचतसे ॥ ५ ॥
एका जनार्दनीं सुखाचा सागरू । विठ्ठल कल्पतरू वोळला आम्हां ॥ ६ ॥

( १६ )

तुमचें नामसंकीर्तन । हेंचि माझें संध्या-स्नान ॥ १ ॥
तुमचे पायांचा साक्षेप । हाचि माझा कालक्षेप ॥ध्रु०॥
तुमचे पायांचें वंदन । हेंचि माझें अनुष्ठान ॥ २ ॥
तुमचे पायांपाशीं निद्रा । हेचि माझी प्रेममुद्रा ॥ ३ ॥
एका जनार्दनाकार । ब्रह्मरूप हा संसार ॥ ४ ॥

( १७ )

अनंताचे गुण अनंत अपार । न कळेचि पार श्रुति-शास्त्रां ॥ १ ॥
तो हा महाराज विटेवरी उभा । लावण्याचा गाभा शोभतसे ॥ध्रु०॥
कटीवरी कर ठेवी जगजेठी । पाहे कृपादृष्टी भक्ताकडे ॥ २ ॥
पुंडलिकाचे तेजें जोडलासे ठेवा । एका जनार्दनीं सेवा देई देवा ॥ ३ ॥

(१८)

काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल ॥ नांदतो केवळ पांडुरंग ॥ १ ॥
भावभक्ति भीमा उदक तें वाहे ॥ बरवा शोभताहे पांडुरंग ॥ २ ॥
दयाक्षमाशांति हेंचि वाळुवंट ॥ मिळालासे थाट वैष्णवांचा ॥ ३ ॥
ध्यान ज्ञान पूजा विवेक आनंद ॥ हाचि वेणुनाद शोभतसे ॥ ४ ॥
दश इंद्रियांचा एक मेळा केला ॥ ऐसा गोपाळकाला होत असे ॥ ५ ॥
देहीं देखिली पंढरी जनीं वनीं ॥ एका जनार्दनीं वारी केली ॥ ६ ॥

(१९)

ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ १ ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥
इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥
माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

(२०)

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥ १ ॥
पताकांचे भार मिळाले अपार । होतो जयजयकार भीमातीरीं ॥ २ ॥
हरिनाम गर्जतां नाहीं भय-चिंता । ऐसें बोले गीता भागवत ॥ ३ ॥
खट-नट यावे शुद्ध होउन जावे । दवंडी पिटी भावें चोखामेळा ॥ ४ ॥

(२१)

देतां घेतां येतां जातां । सदा तुझी सन्निधता ॥ १ ॥
नाहींचि कल्पांतीं वियोग । ऐसें व्यापियलें अंग ॥ २ ॥
स्वप्न निद्रे आणि जागृती । अवघे ठायीं तुझीचि स्तुती ॥ ३ ॥
निळा म्हणे देखे ऐके । संगें तुझ्या जें जें चाखे ॥ ४ ॥

(२२)

दिसे तोचि जनीं वनीं । विठ्ठल हृदयीं त्रिभुवनीं ॥ १ ॥
लेणें नेसणें भूषणें । विठ्ठल वस्त्रें परिधानें ॥ २ ॥
अन्नभोजन उदकपान । विठ्ठल सुषुप्ती शयन ॥ ३ ॥
निळा म्हणे वाचा बोली । विठ्ठल होऊनियां ठेली ॥ ४ ॥

★

# पदें

(१)

गोविंदु गे! माय गोपाळु गे!।
सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु गे ॥ ध्रु० ॥
सांवळें सगुण सकळ गुणांचें निधान।
परमानंदमूर्ति पाहतां हर्षलें मन ॥ गोविंदु० ॥ १ ॥
त्रिभंग गड देहुडें ठाण मांडुनियां माय।
कल्पद्रुमातळीं वेणु वाजवितो आहे ॥ गोविंदु० ॥ २ ॥
शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अचळ।
बाप रखुमादेवीवरु विठ्ठल सकळ ॥ गोविंदु० ॥ ३ ॥

(२)

चंद्रा पूर्णिमे पूर्ण शोभा। कळा तुटलीया कैंची तेथें प्रभा ॥ १ ॥
तैसा कां गा निकुर करिसी। सर्वांठायीं विभांडिसी गा देवा ॥ २ ॥
कापुरीं हतीसीं रुसणें केलें। तरी सांगा वा कवणाचें काय गेलें ॥ ३ ॥
तरंगुनि मालिया जळा सागरु। सागरासी नाहीं दुसरा उपचारु ॥ ४ ॥
शिरा शरीरा येकवंकी जैसी। आतां तुझ्यां पायीं पाइकी तैसी गा देवा ५
रखुमादेवीवरू विठ्ठला राणेराया। मी न बोलें तरी बोलें तुझिया काजा गा देवा ॥ ६ ॥

(३)

गोड तुझें नाम विठोबा! आवडतें मज।
दुजें विचारितां मना वाटतसे लाज ॥ ध्रु० ॥
कर्म आणि धर्म आचरती जयालागीं।
साधक शीणले साधन साधितां अभागी ॥ गोड० ॥ १ ॥
भक्ति आणि मुक्ति नामापाशीं ह्या प्रत्यक्ष।
चारी वेद सहा शास्त्रें देताती साक्ष ॥ गोड० ॥ २ ॥
रखुमादेवीवरा बापा विठ्ठलाची आण।
काया वाचा चित्तें चरणीं ठेविलींस गहाण ॥ गोड० ॥ ३ ॥

( ४ )

धांव पाव सांवळे विठाबाई कां मनिं धरिली अढी ।
अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी। विठोबा कां मनिं० ॥ध्रु०॥
एकनाथाघरिं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी ।
कबीराचे ते शेले विणुनी त्यांची घालिसि घडी ॥ कां० ॥ १ ॥
सांवत्यामाळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसि जुडी ।
नरसीमेहत्याची हुंडी पटवुनि त्याचा झालासी गडी ॥ कां० ॥ २ ॥
जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी ।
सजन कसाई मांस विकितो त्याची लाविसि धडी ॥ कां० ॥ ३ ॥
दामाजीपंताचे वेळीं झाला महार तांतडी ।
पायीं वहाणा हातीं काठी खांद्यावर घोंगडी ॥ कां० ॥ ४ ॥
चोखामेळ्याचे घरीं येउनी ओढिसी ढोरें तांतडी ।
त्याची स्त्री बहु हांका मारी कोठें दिधली दडी ॥ कां० ॥ ५ ॥
गजेंद्राचा धांवा ऐकुनि वेगें घालिसि उडी ।
अर्जुनरथिं सारथ्य करूनी फेडिसि त्याचीं सांकडीं ॥ कां० ॥ ६ ॥

( ५ )

येई गा ! तूं येई गा ? तूं पंढरीच्या राया ! ।
तुजवीण शीण वाटे, क्षीण झाली काया ॥ ध्रु० ॥
याति हीन मति हीन कर्म हीन माझें ।
सर्वंहि लज्जा सोडुनि बापा ! शरण आलों तुज ॥ येई० ॥ १ ॥
दीनानाथ दीनबंधु नाम तुम्हां साजे ।
पतितपावन ऐसि जगीं ब्रीदावळी गाजे ॥ येई० ॥ २ ॥
विटेवरी उभा नीट कटीवरी कर ।
तुका म्हणे आम्हा हेंचि ध्यान निरंतर ॥ येई० ॥ ३ ॥

★

# श्रीविठोबाच्या आरत्या

(१)

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा॥ पुंडलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा। चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा॥१॥ जय देव जय देव जय पांडुरंगा। रखुमाईवल्लभा, राईच्या वल्लभा पावें जीवलगा॥ध्रु०॥ तुलसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं। कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं॥ देव सुरवर नित्य यती भटी। गरुड हनूमंत पुढें उभे राहती॥ जय०॥२॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा। सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां॥ राई रखुमाबाई राणीया सकळा। ओंवाळीती राजा विठोबा सांवळा॥जय०॥३॥ ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती। चंद्रभागेमाजीं सोडुनियां देती॥ दिंड्या पताका वैष्णव नाचती। पंढरीचा महिमा वर्णावा किती॥ जय०॥४॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती। चंद्रभागेमध्यें स्नानें जे करिती॥ दर्शनेहेळामात्रें तयां होय मुक्ती। केशवासी नामदेव भावें ओंवाळीती॥ जय देव जय देव जय०॥५॥

(२)

येईं हो विठ्ठले माझे माउलीये॥ निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें॥ ध्रु०॥ आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप॥ पंढरपुरीं आहे माझा मायबाप॥ येईं०॥१॥ पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला॥ गरुडावरि बैसोनि माझा कैवारी आला॥॥ येईं०॥२॥ विठोबाचें राज्य आम्हां नित्य दीपवाळी॥ विष्णुदास नामा जीवेंभावें ओंवाळी॥ येईं हो विठ्ठले०॥३॥

(३)

आरती अनंतभूजा॥ विठो पंढरीराजा॥ न चलती उपचार॥ मनें सारिली पूजा॥ध्रु०॥ परेस पार नाहीं॥ न पडे निगमा ठायीं॥ भुलला भक्तिभावें॥ लाहो घेतला देहीं॥१॥ अनिर्वाच्य शुद्धबुद्ध॥ उभा राहिला नीट॥ रामा जनार्दनीं॥ पायीं जोडली वीट॥२॥

( ४ )

विठ्ठला मायबापा ॥ वारीं त्रिविधतापा ॥ संसारीं त्रासलों मी ॥ वय लागलें मापा ॥ ध्रु० ॥ बाळपणीं नाठविलें ॥ व्यर्थ तारुण्य गेलें ॥ जरा हें दुःख मोठें ॥ पुढें ठाकूनि आलें ॥ विठ्ठला० ॥ १ ॥ भक्तीचा लेश कांहीं ॥ सत्समागम नाहीं ॥ परिणामीं काय आतां ॥ शरण आलों तुझे पायीं ॥ विठ्ठला० ॥ २ ॥ हरीं हरी माझी भ्रांती ॥ म्हणुनि आलों काकूळती ॥ कृपाळुवा जगन्नाथा ॥ तारीं गंगाधरसुता ॥ ३ ॥

( ५ )

ओंवाळूं आरती माझ्या पंढरीराया, माझ्या पंढरीराया ॥ सर्वभावें शरण आलों तूझिया पायां ॥ ध्रु० ॥ सर्व व्यापुनि कैसें रूप राहिलें अकळ, रूप राहिलें अकळ ॥ तो हा गवळ्याघरीं झाला कृष्ण गोपाळ ॥ १ ॥ स्वरूप गुणातीत अवतार धरी, अवतार धरी ॥ तो हा पांडुरंग उभा विटेवरी ॥ २ ॥ भक्तांच्या काजा कैसा रूपासी आला, कैसा रूपासी आला ॥ ब्रीदाचा तोडरू चरणीं मिरवीला ॥ ३ ॥ आरतें आरती कैसी ओंवाळीली ॥ कैसी ओंवाळीली ॥ वाखाणितां कीर्ति वाचा परतली ॥ ४ ॥ भावभक्तीवळें होसी कृपाळू देवा, होसी कृपाळू देवा ॥ तुका म्हणे तुझ्या न कळती मावा ॥ ५ ॥

( ६ )

धन्य दिवस आजी दर्शन संतांचें, दर्शन संतांचें ॥ नांदे तयां घरीं दैवत पंढरीचें ॥ ध्रु० ॥ धन्य पुण्यरूप कैसा झाला संसारू, कैसा झाला संसारू ॥ देव आणि भक्त दूजा नाहीं विचारू ॥ १ ॥ धन्य पूर्वपुण्य ओढवलें निरुतें, पुण्य ओढवलें निरुतें ॥ संतांचें दर्शन झालें भाग्यें बहुतें ॥ २ ॥ तुका म्हणे धन्य आम्हां जोडिला जोडी, आम्हां जोडिला जोडी ॥ संतांचे चरण आतां जीवें न सोडीं ॥ ३ ॥

(७)

गावों नाचों विठो करूं तुझा अनुवाद, तुझा अनुवाद ॥ जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥ ध्रु० ॥ आनंद रे विठोबा झाला माझे मनीं, झाला माझे मनीं ॥ देखिलीं विटेसहित पाउलें लोचनीं ॥ १ ॥ न करीं तपसाधनें मुक्तीचे सायास, मुक्तीचे सायास ॥ हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें कायी, उणें तें कायी ॥ पंढरीचा राणा आम्हीं सांठविला हृदयीं ॥ ३ ॥

(८)

ओंवाळूं गे माये विठ्ठल सबाह्य साजिरा, सबाह्य साजिरा ॥ राईरखुमाबाई सत्यभामेच्या वरा ॥ ध्रु० ॥ कनकाचे पर्यळीं उजळोनी आरती, उजळोनी आरती ॥ रत्नदीपशोभा कैशा प्रकाशल्या ज्योती ॥ १ ॥ मंडितचतुर्भुज कानीं शोभति कुंडलें, कानीं शोभति कुंडलें ॥ श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकलें ॥ २ ॥ वैजयंतीमाळ गळां शोभे स्यमंत, गळां शोभे स्यमंत ॥ शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥ ३ ॥ सांवळा सुंदर जैसा कर्दळिचा गाभा, जैसा कर्दळिचा गाभा ॥ चरणींचीं नूपुरें वांक्या गर्जती नभा ॥ ४ ॥ ओंवाळीतां मन माझें ठाकलें ठायीं, माझें ठाकलें ठायीं ॥ समाधिस्थसमान तुकया लागला पायीं ॥ ओंवा० ॥ ५ ॥

(९)

संत सनकादिक भक्त मिळाले अनेक स्वानंदें गर्जती पाहूं आले कौतुक ॥ १ ॥ नवल होताहे आरती देवाधिदेवा ॥ स्वर्गींहूनि सुरवर पाहूं येताति भावा ॥ ध्रु० ॥ नरनारी तटस्थ अवघे पडले नयना ॥ ओंवाळितां श्रीमुख धणी न पुरे मना ॥ २ ॥ एकाजनार्दनीं मंगल कौतुकें गाती, मंगल आरत्या गाती ॥ मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥

★

# शेजारती

पावला प्रसाद आतां विठो निजावें।
आपला तो श्रम कळों येतसे भावें॥ १॥

आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा।
पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा॥ २॥

तुम्हांसी आम्हीं जागविलें आपुलिया चाडा।
शुभाशुभ कर्म दोष हरावया पीडा॥ ३॥

तुका म्हणे दिधलें उच्छिष्टाचें भोजन।
नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया भिन्न॥ ४॥

# मागणें

(१)

हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मीं तुझा दास॥ १॥
पंढरीचा वारकरी। वारी चुकों नेदीं हरी॥ ध्रु०॥
संतसंग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा सुकाळ॥ २॥
चंद्रभागे स्नान। तुका मागे हेंचि दान॥ ३॥

(२)

हेंचि दान दे गा देवा। तुझा विसर न व्हावा॥ १॥
गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी॥ २॥
नलगे मुक्ती धनसंपदा। संतसंग देईं सदा॥ ३॥
तुका म्हणे गर्भवासीं। सुखें घालावें आम्हांसी॥ ४॥

★

# पंढरीचा वारकरी

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रांतला फार मोठा संप्रदाय आहे. वारी म्हणजे खेप. दर आषाढी-कार्तिकीला पंढरीच्या खेपा करणारा तो वारकरी. हा विठ्ठलाचा भक्त आणि भागवतधर्माचा उपासक होय. याला 'पंढरपुर' म्हणजे पृथ्वीवरलें वैकुंठ वाटतें. हा वारकरी संप्रदाय उभ्या महाराष्ट्रांतच नव्हे तर कर्नाटकांतसुद्धां इथून तिथून पसरलेला आहे. गोमंतकापासून तों थेट वऱ्हाड-खानदेशपर्यंत कुठेंही जा, – '**पंढरीचा राणा चला पहायाला जाऊं। संसारांत होऊं कृतकृत्य ।**' — ही आस थोरामोठ्यांपासून तों तहत मोलमजुरी करणाऱ्या गोरगरीबांपर्यंत सर्वांच्या हृदयाला लागलेली असते. संतांप्रमाणेंच पंढरीला हे लोक माहेर समजतात. विठोबा-रखुमाई हे त्यांचे मायबाप, पुंडलीक हा भाऊ आणि भीमाई ही बहीण, अशीं हीं त्यांचीं नातीं आहेत. चंद्रभागेचें स्नान, पुंडलिकाचें दर्शन व पांडुरंगाची भेट म्हणजे त्यांना 'अलभ्य लाभ.'

प्रतिवर्षी आषाढी-कार्तिकीला लक्षावधि वारकरी हातांत भगव्या पताका घेऊन नाचत बागडत, तोंडानें विठ्ठलनामाचा गजर करीत पंढरीला यावयास निघतात. पांडुरंगाच्या दर्शनासाठीं वेडावलेली ही मंडळी चंद्रभागेच्या वाळवंटांत उतरते. इथें टाळ-मृदंगांच्या तालावर भावोन्मत्त होऊन जेव्हां वारकरी नाचूं लागतो, तेव्हां तो अक्षरशः देहभान विसरतो. एवढेंच नव्हे तर विठ्ठलाच्या नामोच्चारानें तो सारी पंढरी दुमदुमून सोडतो. मग विठोबाचें दर्शन. लांबट मुखमुद्रा, फुगीर गाल, मस्तकीं टोपीसारखा मुकुट, कानांत कुंडलें, गळ्यांत कौस्तुभ व कमरेंत तिपेडी मेखला असलेली विठ्ठलाची काळीसांवळी मूर्ति म्हणजे प्रत्येक वारकऱ्याचें आशास्थान होय. या पांडुरंगाला जेव्हां तो डोळा भरून पाहील तेव्हांच तो आपल्या पंढरीच्या वारीची सांगता झाली असें समजून स्वतःस धन्य समजेल.

★

# पंढरपुरांतील प्रेक्षणीय स्थळें

पंढरपुर हें महाराष्ट्रांतील अग्रगण्य क्षेत्र होय. तें सोलापुर जिल्ह्यांत बार्शीलाईट रेल्वेवर आहे. पुंडलिकाच्या भेटीसाठीं द्वारकेचा श्रीहरी येथें आला. पुंडलिकानें येथें त्याला विटेवर उभें केलें आणि हें क्षेत्र निर्माण झालें. या क्षेत्राचा विस्तार बराच मोठा असून येथील कांहीं स्थळें प्रेक्षणीय आहेत.

**(१) चंद्रभागा :**–हिचें नांव आहे भीमा. पण या ठिकाणीं तिला चंद्रकोरे-सारखा बांक मिळाल्यामुळें ती 'चंद्रभागा' झाली. भीमाशंकराच्या डोंगरावरून उगम पावून रायचूरजवळ ती कृष्णेला मिळते. तिच्याच कांठीं पुंडलीक हा भक्तराज जन्मला. येथें आलेला प्रत्येक वारकरी चंद्रभागेचें स्नान केल्याशिवाय पांडुरंगाचें दर्शन करणार नाहीं. संतांच्या व भक्तांच्या हृदयांत तिला फार मोठें स्थान आहे.

**(२) पुंडलिकाचें मंदिर :**— ज्याचें शिखर सर्वांत उंच आहे तेंच पुंडलिकाचें मंदिर. एका शिवलिंगाला घातलेल्या मुखवट्याच्या रूपानें पुंडलीक आपणांस दर्शन देईल. येथें पुंडलिकाच्या दर्शनाच्या आधीं देवाचें दर्शन घेऊं नये, असा भाविकांचा समज दृढ आहे.

**(३) नामदेवाची पायरी :**— राउळांत प्रवेश करतांना महाद्वाराची पहिली पायरी म्हणजेच नामदेवाची पायरी होय ! जातां येतां संतांची चरणधूली आपल्या अंगावर पडावी म्हणून महाद्वाराच्या पहिल्या पायरीवर नामदेवानें जी जागा मागितली ती हीच होय. ही पायरी पितळी पत्र्यानें मढविलेली असून नामदेवाचा पितळी मुखवटा तिच्या उजव्या अंगाला ठेवलेला असतो. भक्तांनीं या पहिल्या पायरीला पदस्पर्श न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

**(४) विटेवरचा राणा :**— महाद्वारांतून आंत जातांच सभामंडप लागतो. तेथें गरुड हनुमंत उभे आहेत. पुढच्या मंडपाला 'सोळखांबी' म्हणतात. तिथें एक विशिष्ट खांब आहे. त्याचें नांव 'गरुडखांब.' याला आधीं कवटाळायचें आणि

मग शेजारच्या वाटोळ्या रंगशिळेवर गिरकी घेऊन नाचायचें; मग विठोबाचें दर्शन. त्याचे दोन्ही हात कटीवर आहेत. गळ्यांत कौस्तुभ, हृदयावर श्रीवत्सलांछन, कानांत मकरकुंडलें आणि मस्तकावर उभ्या टोपीच्या आकाराचा मुकुट असें त्याचें ध्यान आहे. हाच तो विटेवरचा राणा पांडुरंग! ज्ञानोबारायाचा 'बाप रखुमादेवीवरु' व अनंत भक्तांचा कैवल्यदानी श्रीविठ्ठल तो हाच! याला डोळां भरून पाहिल्याशिवाय वारकरी जागचा हालणार नाहीं.

(५) **रखुमाई :**— विठ्ठलमंदिराजवळच हिचें एक स्वतंत्र मंदिर आहे. कथाकीर्तनासाठीं विस्तीर्ण मंडप आहे. समोर दीपमाळा आहेत. हिचें दुसरें मंदिर उत्तरेस वाळवंटाच्या कडेला आहे. देऊळ छोटेंसेंच असून तें 'लखूबाईचें मंदिर' म्हणून प्रसिद्ध आहे. लखूबाई म्हणजेच रुक्मिणी. सभोंवतीं चिंचांचें बन आहे. गाभाऱ्यांत तिची चतुर्भुज मूर्ति आहे. भाविकांनीं अवश्य दर्शनाचा लाभ घ्यावा.

(६) **नामदेव-मंदिर :**— कासार घांटावरचें हें नामदेवाचें देऊळ प्रशस्त, स्वच्छ आणि रम्य आहे. येथें क्षणभर बसल्याशिवाय व त्याचे चरणीं माथा नम्र केल्याशिवाय वारकरी पुढें कसा जाईल? कारण नामदेव म्हणजे पंढरीचें भूषण होय. प्रत्यक्ष देवाचा व त्याचा साक्षात् संवाद चाले. नामदेवानें दाखविलेला नैवेद्य पांडुरंगानें खुशाल खावा व त्याच्या कथाकीर्तनांत स्वतः रंगून जावें, अशी त्याची ख्याती. त्यामुळें पुंडलिकाप्रमाणेंच नामदेवालासुद्धां भाविकांच्या हृदयांत फार मोठें स्थान आहे.

(७) **विष्णुपद :**— याचा सोळखांबी दगडी मंडप चंद्रभागेच्या पात्रांतच आहे. पुंडलिकाच्या देवळापासून याचें अंतर मैलाच्या आंतच आहे. हें विष्णुपद म्हणजे गयेच्या विष्णुपदाची लहानशी प्रतिकृति आहे. येथें गायीचीं पावलें, देव जेवला ती दगडी वाटी, समचरण आणि देहुडाचरण अशीं दोन्ही प्रकारचीं पावलें आहेत. येथेंच पितरांच्या उद्देशानें पिंडदान करून यात्रेकरू गयाश्राद्धाचें पुण्य मिळवितात.

(८) **गोपाळपुर** :— ही एक लहानशी वाडी आहे. भुईकोटासारखें इथें जें एक दगडी देऊळ आहे, तेंच गोपाळकृष्णाचें देऊळ होय. आषाढी-कार्तिकी पौर्णिमेला येथें काला होतो. वारीची सारी यात्रा त्यावेळीं येथें जमा होते. येथील काल्याचा प्रसाद घेतल्याशिवाय वारकरी पंढरपुर सोडणार नाहीं. जवळच तळघरांत 'नामयाची जनी' व तिचा संसार – उखळ, मुसळ, खाट, गोधडी इत्यादि पहावयास मिळेल.

याशिवाय दत्तघांटावरील विप्रांच्या मठांतील एक शिर व सहा हातांची शाळिग्रामशिळेची श्रीदत्तमूर्ति व लखूबाईच्या मंदिरांतील श्रीमारुतीरायाची मूर्ति म्हणजे वारकरी मंडळींचें आशास्थान होय. भक्तिभावानें यांच्यापुढें नम्र झाल्याशिवाय किंवा दिंडी निघाली असतां यांच्या द्वारीं दोन अभंग म्हटल्याशिवाय ते पुढें जात नाहींत. तसेंच श्री. खासगीवाल्यांच्या वाड्यांतील सुवर्णाच्या मूर्ति – राही, रखुमाई आणि विठ्ठल, पहाण्यासारखीं आहेत. दर आषाढी-कार्तिकीला याच मूर्तींची रथांतून मिरवणूक निघते. तरी भाविकांनीं अवश्य दर्शनाचा लाभ घ्यावा.

★

## भजनावलि

विठोबा रखुमाई । जय जय विठोबा रखुमाई ॥
ज्ञानोबा माउली तुकाराम । ज्ञानराज माउली तुकाराम ॥
जीवाचे जिवलगे । मनाचे मोहने येई पांडुरंगे ॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई । एकनाथ नामदेव तुकाराम ।
आवडिनें हीं नामें गाती । ते नर पावति मंगलधाम ॥
रामसीता कृष्णराधा । विठ्ठले रखुमाई ॥
जय विठ्ठल । जय जय विठ्ठल ॥

★

अनुक्रम 9.4.3५५ विभाग ... क्रां. १२८८९ नों. दि. २१/७/५४ ...लय

# ज्ञानोबाच्या पालखीचा सोहळा

श्रीज्ञानेश्वर महाराजांची पालखी आषाढीच्या वारीला जाण्याकरतां ज्येष्ठ वद्य अष्टमीला निघते. दुपारीं बरोबर तीन वाजल्यापासून प्रस्थानाच्या कार्यक्रमाला सुरुवात होते. पालखींत श्रीज्ञानेश्वर माउलींच्या पादुका आणून ठेवतात. त्यांची यथाविधी पूजा केल्यावर 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषांत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरीला जावयास निघते. पालखीबरोबर हजारों वारकरी चालत असतात. आळंदी ते पंढरपुरचा हा प्रवास सरासरी १६० मैलांचा आहे. पालखीचा जाण्याचा मार्ग, मुक्कामाचा गांव इत्यादि गोष्टी ठरलेल्या आहेत ; त्याचा तक्ता खालीं देत आहोंत —

| निघण्याचें गांव | मिति | अंतर मैल | दुपारचा मुक्काम | अंतर मैल | रात्रीचा मुक्काम |
|---|---|---|---|---|---|
| आळंदी | जेष्ठ व. ९ | ७ | कळसाचा ओढा | ६ | भवानी पेठ-पुणें |
| पुणें | ११ | ९ | दोन विहिरी | १० | सासवड |
| सासवड | १३ | ६ | शिवरी-यमाईचें देऊळ | ४ | जेजूरी |
| जेजूरी | १४ | ३ | ढवळज ओढा | ४ | वाल्हा |
| वाल्हा | अमावास्या | ५ | निरा | ६ | लोणंद |
| लोणंद | आषाढ शु. १ | | | ५ | तरड गांव |
| तरडगांव | २ | ४ | काळज ओढा | ८ | फलटण |
| फलटण | ३ | ३ | वेडणी | ८ | बरड |
| बरड | ४ | ४ | राजूरी | ९ | नातेंपुतें |
| नातेंपुतें | ५ | ४ | मांडवीचा ओढा | ८ | माळशिरस |
| माळशिरस | ६ | ४ | खुडुसचा ओढा | ८ | वेळापूर |
| वेळापूर | ८ | ३ | नंदाचा ओढा | ४ | शेगांव |
| शेगांव | | | | ८ | वाखरी |
| वाखरी | | | | ५ | पंढरपूर |

★ 6343

REFBK-0008353
REFBK-0008353